## प्रेस नोट ता. १४/०४/२०२३

# बुलेट चोरणारा चोराटा गुन्हे शाखा युनिट ०२ च्या जाळयात

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

चिंचवड पोलीस स्टेशन हद्दी मधिल बुलेट चहा चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी रोड चिंचवड याठीकाणी फिर्यादि नामे सुधिर पावलस गजभिव वय ३८ वर्षे धंदा नोकरी रा. आबासाहेब चिंचवडे इंन्डस्ट्रीज फिट फाईन शेजारी, वाल्हेकरवाडी, चिंचवड. यानी रात्री त्यांच्या मालकीची बुलेट मोटार सायकल पार्क करुन ते रात्री घरी गेले होते. सकाळी ते त्यांची बुलेट घेण्यास गेले असता बुलेट मोटार सायकल क्रमांक एमएच १६ सी.झेड. ९४५९ हि चोरीस गेली असल्याची लक्षात आले त्यांनी गाडी चोरीची तक्रार चिंचवड पोलीस स्टेशन येथे दिनांक ०८/०४/२०२३ रोजी दिली होती.

गुन्हे शाखा युनिट ०२ चे पोलीस सदर बुलेट चोराचा शोध घेत असताना सपोफौ. दिपक खरात यांना बुलेट हि धर्मराज दत्तु बंडगर याने चोरल्याचे रोडचे सी.सी.टी.व्हि. कॅमेरे पाहुन समजले त्यांनी बुलेट चोर याचा माग काढताना आज दि. १४/०४/२०२३ रोजी इसम नामे धर्मराज दत्तु बंडगर हा दगडोबा चौक, चिंचवडेनगर चिंचवड येथे आला असल्याचे माहिती मिळाल्याने त्यास पोलीस उपनिरीक्षक गणेश माने, सपोफौ दिपक खरात, पोहवा जयवंत राऊत, पोना देवा राऊत यांच्या पथकाने सापळा रचुन चोरीस गेलेलया बुलेट मोटार सायकल क्रमांक एमएच १६ सी.झेड. ९४५९ याचेसह पकडेल आहे.

सदरची कारवाई हि स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. प्रशांत अमृतकर, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ०२ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलिस उप-निरीक्षक गणेश माने, सपोफौ दिपक खरात, पोहवा ८३२ जयवंत राऊत, पोना १६०३ देवा राऊत यांच्या पथकाने केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त
गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड.



Scanned with OKEN Scanner